आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ डिसेंबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचं वितरण/ छत्रपती संभाजीनगरच्या अर्णव महर्षीचा विजेत्यांमधे समावेश

- केंद्र सरकार सर्वसामान्यांचं जीवन सुलभ करण्यासाठी वचनबद्ध असून येणाऱ्या काळात सुधारणा आणखी वेगानं होतील, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मुख्य सचिवांच्या राष्ट्रीय परिषदेला आज नवी दिल्लीत प्रारंभ

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये भारत विरुद्ध श्रीलंका तिसरा टी-ट्वेंटी सामना आज तिरूवनंतपुरम इथं होणार

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यानी आज नवी दिल्ली इथं 'वीर बाल दिना'निमित्त प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचे वितरण केलं. या वर्षी १८ राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांतल्या मिळून २० मुलांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात राष्ट्रपती म्हणाल्या, पुरस्कार विजेत्या मुलांनी शौर्य, कला आणि संस्कृती, पर्यावरण, नाविन्यपूर्ण संशोधन, तसंच विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसह विविध क्षेत्रांत असाधारण योगदान दिलं आहे.

**… होल्ड- बाईट- राष्ट्रपती**

छत्रपती संभाजीनगरचा अर्णव महर्षी याचा या पुरस्कारविजेत्यांमधे समावेश आहे. पॅराप्लेजिक रुग्णांच्या आरोग्यात सुधारणा करणाऱ्या दोन नवोपक्रमांसाठी राष्ट्रीय बाल पुरस्कार मिळाल्याचं त्यानं सांगितलं.

**- होल्ड - अर्णव महर्षी - -**

**- <><><><><>**

संपूर्ण देश आज साहेबजादा बाबा जोरावर सिंह आणि बाबा फतेह सिंह यांच्या अतुलनीय शौर्य आणि त्यागाचं स्मरण करत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत वीर बाल दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी राष्ट्रीय बाल पुरस्काराच्या २० विजेत्यांशी संवाद साधला. मुघलांच्या अत्याचारासमोर अढळ निश्चयाने उभे ठाकलेल्या साहेबजाद्यांनी आपल्या वयापेक्षा कितीतरी अधिक पटीने शौर्य दाखवल्याचं मोदी आपल्या संबोधनात म्हणाले. गेल्या चार वर्षांपासून वीर बाल दिवस त्यांची प्रेरणा आणि त्याग पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले.

राष्ट्र प्रथम ही विचारधारा आपल्या जीवनाचा मार्गदर्शक म्हणून स्वीकारण्याचं आवाहन महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी केलं. देशातली लहान मुलं ही विकसित देशात परिवर्तन घडवणारे महत्त्वाचे घटक आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळण्याची गरज असून ती मिळाली तर ही मुलं अशक्य गोष्टीही शक्य करून दाखवू शकतात, असं अन्नपूर्णा देवी म्हणाल्या.

वीर बाल दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत

शीख धर्माचे दहावे गुरु गोविंदसिंह यांचे सुपुत्र साहेबजादे बाबा जोरावर सिंग आणि साहेबजादे बाबा फतेह सिंग यांच्या हौतात्म्याचं स्मरण या दिवशी केलं जातं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साहेबजादा जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग यांना श्रद्धांजली वाहिली. मुंबईत शीव कोळीवाडा इथल्या गुरुद्वारात आयोजित कार्यक्रमात त्यांनी भाग घेतला. मुंबईत राज्यपालांचं निवासस्थान महाराष्ट्र लोकभवन इथं ही साहेबजाद्यांना श्रद्धांजी वाहण्यात आली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात वीर साहिबजाद्यांच्या बलिदानासोबतच माता गुजरीदेवी यांची अढळ श्रद्धा आणि गुरु गोबिंदसिंह यांचे शाश्वत उपदेश यांचं स्मरण केलं. हा दिवस धैर्य आणि धर्मनिष्ठेचे प्रतीक असून, साहिबजाद्यांचं जीवन आणि त्यांचे आदर्श देशाच्या भावी पिढ्यांना सदैव प्रेरणादायी ठरतील, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकार सर्वसामान्यांचं जीवनमान सुलभ करण्यासाठी वचनबद्ध असून येणाऱ्या काळात सुधारणा आणखी वेगानं होतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. समाज माध्यमावरच्या संदेशात मोदी म्हणाले की, सरत्या वर्षात आपल्या सरकारने केलेल्या सुधारणांमुळे प्रशासनातला बदल ठळकपणे दिसून आला. या सुधारणा गुंतागुंत सोडवून त्याचा इच्छित परिणाम साध्य करण्यासाठी केल्या गेल्या होत्या. कररचनेचं सुलभीकरण, विवादांचं जलदगतीने निराकरण, आधुनिक कामगार संहिता यांमुळे संघर्ष कमी झाला. सरकारचा भर विश्वास, अनुमान आणि दीर्घकालीन प्रगती यावर असल्याचंही मोदी आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीनं विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत विकासकामं राबवण्यात येतील असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी सांगितलं आहे. दूरदर्शनच्या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी संगितलं की जीरामजी योजनेत सव्वाशे दिवस काम पुरवण्याची तरतूद आहे, तसंच कामासाठी अर्ज केल्यापासून १५ दिवसात काम मिळालं नाही तर बेरोजगारी भत्ता देण्याचीही सोय आहे. ...

- **- - बाईट - शिवराजसिंग चौहान - -**

या योजनेसाठी प्रशासकीय खर्च १ लाख ५१ हजार कोटी रुपये अपेक्षित असून त्यात केंद्र सरकारचा वाटा ९५ हजार कोटीपेक्षा जास्त आहे.

**<><><><><>**

सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मुख्य सचिवांची बैठक आज नवी दिल्लीत सुरु होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या बैठकीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आणि परवा संबोधित करतील. राष्ट्रीय विकासासाठी रचनात्मक आणि शाश्वत संवादाच्या माध्यमातून केंद्र आणि राज्याची भागीदारी मजबूत करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची मानली जात आहे. यावर्षी या परिषदेचा मुख्य विषय 'विकसित भारतासाठी मानवी भांडवल' असा असून यात राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांसाठी सर्वोत्तम कार्यपद्धती आणि धोरणांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या विषयांतर्गत प्रामुख्यानं शालेय पूर्व शिक्षण, शालेय शिक्षण, कौशल्य

विकास, उच्च शिक्षण तसंच क्रीडा आणि अतिरिक्त उपक्रम या क्षेत्रांवर विशेष भर दिला जाणार आहे.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाच्या आर्थिक प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला आणि आर्थिक सुधारणा घडवून लाखोंना गरीबीतून बाहेर काढलं असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, आणि काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी डॉ सिंग यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

थोर स्वातंत्र्यसेनानी शहीद उधम सिंह यांच्या १२६व्या जयंतिनिमित्त आज देश त्यांचं स्मरण करत आहे. फाळणीपूर्व भारतातल्या पंजाबमध्ये सुनाम या गावात १८९९मध्ये सिंह यांचा जन्म झाला होता. जालियनवाला बागेत जमलेल्या देशबांधवांवर गोळ्या झाडण्याचे आदेश देणाऱ्या मायकल ओडवायर या ब्रिटीश अधिकाऱ्याची त्यांनी हत्या केली होती. स्वातंत्र्य लढ्यात सुरू झालेल्या गदर चळवळीचे ते सक्रिय सदस्य होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज स्वातंत्र्यसैनिक शहीद उधम सिंह यांच्या जयंतिनिमित्त त्यांना अभिवादन केलं.

**<><><><><>**

दिल्लीत हवेचा दर्जा ढासळत असल्यामुळे एअर प्युरिफायरवरचा जीएसटी कमी करावा अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयानं केंद्र सरकारकडून जबाब मागितला आहे. एअर प्युरिफायरवर सध्या १८ टक्के जीएसटी आकारला जातो. मात्र हे उपकरण गरजेचं झालं असून,  वैद्यकीय उपकरण गणलं जावं आणि त्यावरचा जीएसटी पाच टक्के करावा, असे निर्देश केंद्र सरकारला द्यावेत अशी मागणी याचिकेत आहे. या याचिकेवर आज न्यायमूर्ती विकास महाजन आणि विनोद कुमार यांच्या सुट्टीकालीन पीठासमोर सुनावणी झाली. या प्रश्नावर केंद्र सरकारने लवकरात लवकर जीएसटी परिषदेची बैठक घ्यावी आणि येत्या १० दिवसांत आपलं उत्तर सादर करावं, असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाने दिले आहेत. पुढची सुनावणी येत्या ९ जानेवारी रोजी होणार आहे.

**<><><><><>**

हक्क न सांगितलेल्या मालमत्तेचा निपटारा करण्यासाठी राज्यभर विशेष शिबिरांचं आयोजन करण्यात येत आहे. राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या वतीनं जिल्हा अग्रणी बँकेमार्फत बीड इथं येत्या २९ डिसेंबरला हे शिबीर घेण्यात येत आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये भारत विरुद्ध श्रीलंका तिसरा टी-ट्वेंटी सामना आज तिरूवनंतपुरम इथं होणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरूवात होईल. पाच सामन्यांच्या मालिकेत भारतीय महिला संघ दोन – शून्यने आघाडीवर आहे.

//<><><><><>//